# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल्.(शिक्षणशास्त्र) या पदवीच्या पूर्ततेसाठी संशोधिकेने संशोधन विषयाचा अभ्यास माननीय गुरुवर्य डॉ. के.डी. गायकवाड यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. त्यांचे वेळोवेळी मिळालेले सखोल व सुयोग्य मार्गदर्शन यामुळेच हा शोध-प्रबंध पूर्ण होवू शकला. संशोधक त्यांची ऋणी आहे.

या संशोधन कार्यात आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य श्री. बी.जे. दळवीसर यांनी प्रेरणा दिली. संशोधन पध्दती व अहवाल लेखनशास्त्र संदर्भातील मार्गदर्शन डॉ. के.डी. गायकवाड यांचेकडून लाभले. तज्ञ मार्गदर्शिका डॉ. रेखा भा. टोपकर (लेक्चरर)एस.पी.एस कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगली यांनी संख्याशास्त्रीय माहिती सुलभ करुन सांगितली. तसेच सौ.पाटील, सौ.भोसले यांनी व कॉलेजचे सर्व प्राध्यापक, कार्यालयीन सेवकवर्ग,सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. या सर्वांची संशोधक अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत संशोधन समस्येच्या संदर्भात माहिती उपलब्ध होण्यास कॉलेजचे मा. प्राचार्य श्री.जाधव,श्री पांढरपट्टे, मा.पर्यवेक्षक श्री. पवार , व ग्रंथपाल श्री. गोडसे, श्री. बाबर, श्री.शेवाळे , श्री.काळभोर सर त्याचप्रमाणे लिपिक श्री. पाटील व श्री. कदम इ. सहशिक्षकांनी संशोधन कार्यात मौल्यवान सहकार्य केले.

या संशोधन अहवालास सुबक व आकर्षक रुप देण्याची जबाबदारी वरद टायपिंग, कराडचे श्री. पवार यांनी व श्री. वाळवेकर सर यांनी समर्थपणे पेलली. संशोधक त्यांचीही ऋणी आहे.

माझ्या संशोधनास प्रेरणा देणारे माझे शिक्षणप्रेमी पती, बंधू-वहिनी, व त्याग व प्रोत्साहनाच्या मूर्ती माझे दोन पुत्र यांच्या सदैव ऋणात राहणे अधिक चांगले असे मी समजते.

**स्थळ :-** सातारा

**दिनांक :-** २६. ६.२००६

**( सौ. शिर्के अंजली सूर्यकांत)**